नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - ३०२ | Issue - 302 | वार मंगळवार दि. २४ मार्च २०२६ | Blow- Tuesday Date 24 March 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# आता कोरोनाच्या परिस्थितीसारखं आपण तयार राहायला हवे

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे थेट संसदेतून देशवासीयांना आवाहन; युद्धग्रस्त देशांशी भारताचे व्यापक व्यापारी संबंध : पंतप्रधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संघर्षावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज लोकसभेत एक महत्त्वाचे निवेदन केले. इराण आणि इस्रायल यांच्यातील वाढता तणाव आणि त्याचे जागतिक परिणाम लक्षात घेता, पंतप्रधान मोदींचे हे भाषण महत्त्वपूर्ण होते. जागतिक परिस्थिती वेगाने बदलत आहे, ज्यामुळे देशाची अर्थव्यवस्था, ऊर्जा सुरक्षा आणि परराष्ट्र धोरणावर संभाव्य परिणाम होऊ शकतो. आपल्या भाषणात पंतप्रधान मोदींनी संभाव्य जागतिक इंधन संकट, जागतिक पुरवठा साखळी आणि स्थिरतेसंदर्भात चर्चा केली. तसेच कोरोनाच्या परिस्थितीसारखं आपण तयार राहायला हवं असेही ते म्हणाले.

आपल्या भाषणात, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सध्याची जागतिक परिस्थिती, भारताची रणनीती आणि सरकारची भूमिका स्पष्ट केली. यापूर्वी, सरकारने संकेत दिले होते की ते मध्य-पूर्वेतील संकटाबाबत सतर्क असून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. गेल्या रविवारी, पंतप्रधान मोदींसोबत झालेल्या एका उच्चस्तरीय मंत्रिमंडळ बैठकीत पश्चिम आशियातील वाढत्या तणावाचा भारताच्या तेल आयातीवर, खतांच्या पुरवठ्यावर आणि व्यवसायावर होणाऱ्या संभाव्य परिणामांवर चर्चा झाली. या बैठकीत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इराणसोबतच्या अमेरिका-इस्रायल संघर्षातून निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा घेतला. जीवनावश्यक वस्तूंची उपलब्धता कायम राखण्यासाठी अल्पकालीन, मध्यमकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. याव्यतिरिक्त, भविष्यात शेतकऱ्यांना खतांची उपलब्धता अखंडित राहावी यासाठी खतांच्या पर्यायी स्रोतांवरही विचारमंथन करण्यात आले.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, या युद्धामुळे भारतासमोर अभूतपूर्व आव्हानेही उभी राहिली आहेत. ही आव्हाने आर्थिक, राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित आणि मानवतावादी आहेत. युद्धग्रस्त आणि युद्धग्रस्त देशांशी भारताचे व्यापक व्यापारी संबंध आहेत. ज्या प्रदेशात हे युद्ध सुरू आहे, तो प्रदेश जगभरातील इतर देशांसोबतच्या आपल्या व्यापारासाठी एक महत्त्वाचा मार्ग आहे. विशेषतः हा प्रदेश आपल्या कच्च्या तेलाची आणि वायूची मोठी गरज भागवतो असे पंतप्रधान म्हणाले.



पश्चिम आशियातील परिस्थिती चिंताजनक

पंतप्रधान मोदी म्हणाले की, सरकार संवेदनशील, दक्ष असून सर्वतोपरी मदत करण्यास तयार आहे. भारताला होर्मुझच्या सामुद्रधुनीतून कच्चे तेल, गॅस आणि खते यांसारख्या जीवनावश्यक वस्तू मोठ्या प्रमाणात मिळतात. युद्धानंतर, या सामुद्रधुनीतून होणारी जलवाहतूक अधिकाधिक आव्हानात्मक झाली आहे. असे असूनही, पेट्रोल, डिझेल आणि गॅसच्या पुरवठ्यावर लक्षणीय परिणाम होणार नाही, हे सुनिश्चित करण्यावर आमच्या सरकारने लक्ष केंद्रित केले आहे. पश्चिम आशियातील परिस्थिती चिंताजनक आहे. हे संकट लवकरात लवकर संपवण्यासाठी सर्वांनी तोडगा काढावा असे आवाहन संपूर्ण जग करत असल्याचे पंतप्रधान म्हणाले.

कोविड महामारीच्या काळात विरोधी पक्षाने केवळ सरकारवर टीका केली : गिरीराज सिंह

मध्यपूर्वेत सुरु असलेल्या संघर्षावर पंतप्रधान मोदींनी लोकसभेत केलेल्या भाषणावर प्रतिक्रिया देताना केंद्रीय मंत्री गिरीराज सिंह म्हणाले, की, पंतप्रधानांच्या भाषणाबद्दल विरोधी पक्षाला काय अडचण आहे? असा सवाल गिरीराज सिंह यांनी केला. कोविड महामारीच्या काळात विरोधी पक्षाने केवळ सरकारवर टीका केली, परंतु पंतप्रधान मोदींनी आपल्या सकारात्मक कृतीतून दाखवून दिले की संकटाचे संधीत रूपांतर कसे करता येते.

# सातारा जिल्हा परिषद निवडणुकीतील राड्याची सखोल चौकशी करणार : मुख्यमंत्री फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष पदाच्या निवडणुकीदरम्यान झालेल्या राड्याचे पडसाद सोमवारी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत उमटले. मतदारांना मतदानापासून वंचित ठेवणे हा लोकशाहीचा खून आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संताप व्यक्त केला, तर विधान परिषदेत उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी सातारा जिल्हा पोलीस अधीक्षक तुषार दोषी यांच्यासह संबंधित पोलीस अधिकाऱ्यांच्या निलंबनाचे आदेश दिले. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिले.

सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडीत भाजपच्या प्रिया शिंदे आणि राजू भोसले विजयी झाले असले, तरी या प्रक्रियेला हिंसक वळण लागले. काही सदस्यांना मतदान प्रक्रियेपासून वंचित ठेवण्यासाठी थेट पोलीस बळाचा वापर करण्यात आल्याचा आरोप झाला. याविषयी विधानसभेत माहिती देताना मंत्री शंभुराज देसाई म्हणाले, मी पक्षाचा प्रतोद म्हणून निवडणूकीपूर्वी जिल्हा परिषद सदस्यांना व्हीप बजावण्यासाठी तेथे उपस्थित होतो. माझ्यासोबत दोन सदस्य मतदानासाठी जात असताना, १०० पोलिसांनी आम्हाला अडवले आणि एखाद्या आरोपीला फरफटत नेतात, याप्रमाणे मला आणि त्या सदस्यांना नेले. मला मुका मार लागला असून, चार दिवसांपासून मी गोळ्या घेत आहे. आमच्याकडे ३३ सदस्य होते आणि त्यांना ते सदस्य कमी करायचे होते. त्यामुळे जिल्हा पोलीस अधिक्षक तुषार दोषी, एलसीबीचे पोलीस निरीक्षक देवकर, सहाय्यक निरीक्षक गर्जे यांच्यासह त्याच्यांसोबत असलेल्या १०० पोलिसांना विधानपरिषद सभागृहात उपसभापतींनी निलंबित केले आहे. या सभागृहानेही त्यांना बडतर्फ करावे, अशी मागणी देसाई केली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही या चर्चेत सहभाग घेतला. ते म्हणाले की, सातारा जिल्ह्यातील घटनेचा मीसुद्धा साक्षीदार आहे. निवडणूक प्रक्रिया सुरू झाल्यानंतर मला शंभुराज देसाई यांनी फोन करून दोन मतदारांवर जुना गुन्हा दाखल करून त्यांना अटक



करण्यात आल्याचे सांगितले. परंतु, त्यांना मतदानापासून वंचित ठेवू नका, असे मी तुषार दोषी यांना फोन करून सांगितले. पोलीस महासंचालकांनाही फोन करून याबद्दल सांगितले. यावर त्यांनी आमचे लोक कुठल्याही परिस्थितीत सदस्यांना मतदानापासून वंचित ठेवणार नसल्याचे स्पष्ट केले होते. पण त्यानंतरही त्यांना अडवण्यात आले. पोलीस मंत्र्यांना आणि मतदारांना (जिल्हा परिषद सदस्य) आरोपीप्रमाणे पकडून घेऊन गेले. महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच अशी परिस्थिती पाहिली, अशा शब्दांत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलेल्या वस्तुस्थितीच्या आधारे या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहाला आश्वस्त केले.

या प्रकरणावरून शिवसेना आणि भाजपच्या मंत्र्यांमध्ये विधान परिषदेत खडाजंगी पाहायला मिळाली. शिवसेनेचे मंत्री शंभूराज देसाई यांनी भाजप कार्यकर्त्यांचा उल्लेख करताच भाजपचे मंत्री जयकुमार गोरे यांनी त्यावर तीव्र आक्षेप घेतला. निवडणूक सुरू असताना मंत्री आत गेलेच कसे? पोलिसांनी कोणाच्या दमदाटीमुळे कोणाला आत सोडले, याचीही चौकशी झाली पाहिजे. वस्तुस्थिती जाणून घेतल्याशिवाय कारवाई करणे अयोग्य आहे, अशी भूमिका गोरे यांनी मांडली.

# सर्व सेवा पुरवठादारांना ॲग्रीगेटर धोरणाच्या कक्षेत आणा : मंत्री सरनाईक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : केवळ प्रवासी वाहतूक सेवा (ओला, उबेर) नव्हे तर डिलिव्हरी सेवा, ई-कॉमर्स कंपन्या, तसेच दोन व चारचाकी वाहनांद्वारे माल वाहतूक करणाऱ्या सर्व सेवा पुरवठादारांना ग्रीगेटर धोरणाच्या कक्षेत आणणे आवश्यक आहे. यामुळे राज्य शासनाचे नियंत्रण वाढेल तसेच महसूलातही वाढ होईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

राज्यात ग्रीगेटर धोरण अंतिम करण्याच्या दृष्टीने परिवहन मंत्री सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीला परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, अपर परिवहन आयुक्त भरत कळसकर तसेच परिवहन विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले की, राज्यात कार्यरत असलेल्या सर्व पुरवठादार कंपन्यांनी परिवहन विभागाकडे नोंदणी



करणे अनिवार्य राहील. यासाठी आवश्यक तांत्रिक पात्रता व अटी पूर्ण केल्यानंतरच तीन वर्षांकरिता परवाना दिला जाईल. त्याचबरोबर, प्रवासी सुरक्षेच्या दृष्टीने प्रत्येक प्रवासासाठी विमा संरक्षण बंधनकारक करणे आवश्यक असून अपघाताच्या घटनांमध्ये प्रवाशांना योग्य भरपाई मिळाली पाहिजे, असेही मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

सर्व ग्रीगेटर कंपन्यांनी राज्यात स्थानिक भाषेत (मराठी) कार्यरत ग्राहक तक्रार निवारण केंद्र (ग्रीव्हियन्स सेल) सुरू करणे अनिवार्य करण्यात येणार आहे. यामध्ये २४७ हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध करून देण्याबाबतचे धोरणात तरतूद करण्याच्या सूचना मंत्री सरनाईक यांनी केल्या.

ड्रायव्हर नोंदणी, पोलीस पडताळणी, स्थानिक रहिवासी निकष, तसेच वाहनांची पार्किंग व्यवस्था यांसारख्या बाबींवरही अटी घालण्याबाबत यावेळी चर्चा झाली. राज्यातील स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी धोरणात आवश्यक तरतुदी करण्याच्या सूचनाही मंत्री सरनाईक यांनी दिल्या.

परिवहन मंत्री सरनाईक यांनी परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांना सर्व सुचना समाविष्ट करून ग्रीगेटर धोरणाचा अंतिम मसुदा तातडीने सादर करण्याचे निर्देश दिले. हे धोरण लवकरात लवकर अंतिम करून जाहीर करावे, जेणेकरून राज्यात कार्यरत सर्व ग्रीगेटर सेवांवर प्रभावी नियंत्रण प्रस्थापित होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

# खासगी कंपन्यांमधील कामाचे तास वाढवणारे विधेयक राज्य सरकारकडून मागे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील दुकाने आणि खासगी आस्थापनांमधील कर्मचाऱ्यांचे दैनंदिन कामाचे तास १० पर्यंत वाढवण्याबाबतचे सुधारित विधेयक राज्य सरकारने सोमवारी मागे घेतले. या विधेयकातील अनेक तरतुदींबाबत पुरेशी स्पष्टता नसल्याने आणि विविध स्तरांवरून उमटलेल्या प्रतिक्रियांमुळे (पान २ वर...) (पान १ वरून..) कामगार विभागाने हे पाऊल उचलल्याचे समजते. सर्व तांत्रिक आणि व्यावहारिक बाबींचा सखोल अभ्यास करून हे विधेयक पुन्हा मांडले जाईल, अशी माहिती कामगार विभागातील एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याने दिली. राज्य सरकारने 'महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियमा'त सुधारणा करून कामाचे तास ९ वरून १० करणे, कार्यकालयोजन १२ तासांपर्यंत वाढवणे आणि विश्रांतीविना ६ तास कामाची मुभा देणे, अशा तरतुदी प्रस्तावित केल्या होत्या. मात्र, या प्रस्तावित बदलांमुळे कामगार संघटना आणि काही आस्थापनांमध्येही मतमतांतरे पाहायला मिळाली. विशेषतः सलग ६ तास काम आणि वाढीव कार्यकालयोजन यामुळे कर्मचाऱ्यांच्या आरोग्यावर आणि कार्यक्षमतेवर काय परिणाम होईल, याबाबत स्पष्टता नव्हती. याविषयी माहिती देताना कामगार विभागातील एका अधिकाऱ्याने सांगितले की, विधेयकातील काही बाबींबाबत अस्थापनांमध्ये आणि संबंधित घटकांमध्ये स्पष्टता नव्हती. परिणामी, अंमलबजावणीत अडचणी येऊ शकल्या असत्या. त्यामुळे तूर्तास हे विधेयक मागे घेण्याचा निर्णय झाला आहे. आता सर्व बाबींचा परिपूर्ण अभ्यास करून त्यात आवश्यक सुधारणा केल्या जातील आणि त्यानंतरच ते पुन्हा सभागृहात मांडले जाईल. या विधेयकात, २० पेक्षा कमी कर्मचारी असलेल्या छोट्या आस्थापनांना 'नोंदणी प्रमाणपत्राची' गरज भासणार नाही, अशी तरतूद करण्यात आली होती. अशा छोट्या व्यावसायिकांना केवळ व्यवसायाची माहिती सरकारला देणे बंधनकारक राहणार होते. व्यावसायिक सुलभता वाढवणे आणि छोट्या दुकानदारांवरील प्रशासकीय भार कमी करणे हा त्यामागील उद्देश होता. मात्र, या बदलामुळे कामगारांच्या हक्कांचे संरक्षण कसे होईल आणि अस्थापनांचे वर्गीकरण कसे निश्चित होईल, यावर अस्थापनांच्या प्रतिनिधींमध्ये एकमत होऊ शकले नाही.

## तीन महिन्यांत संपूर्ण राज्याचे 'ईटीएस' सर्वेक्षण

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची विधानसभेत घोषणा

# राज्यातील अवैध उत्खननावर 'एसआयटी'चा हातोडा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पुढील तीन महिन्यांत संपूर्ण राज्याचे ईटीएस (इलेक्ट्रॉनिक टोटल स्टेशन) सर्वेक्षण आणि गुगल मॅपिंग केले जाईल,अशी घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी विधानसभेत केली. त्याशिवाय ठाणे, पालघर, रायगड आणि नवी मुंबई परिसरातील डोंगरांचे लचके तोडणाऱ्या अवैध उत्खननांची सखोल चौकशी करण्यासाठी आयपीएस अधिकारी आणि विभागीय आयुक्तांच्या नेतृत्वाखाली 'एसआयटी' (विशेष तपास पथक) नेमण्याचेही त्यांनी जाहीर केले.

आमदार सुनील प्रभू यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना महसूलमंत्री बोलत होते. अनेक ठिकाणी खाणपट्ट्यांची वैधता तपासली गेलेली नाही, पर्यावरण अनुमती नाही आणि स्फोटकांच्या वापरासाठी आवश्यक लायसन्सही नाही. हे सर्व प्रकार रोखण्यासाठी आता पुढच्या तीन महिन्यांत मागील पाच वर्षांतील परवानग्यांचा लेखाजोखा घेतला जाईल, असे बावनकुळे यांनी सांगितले. महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले, अवैध उत्खननातील रॅकेट उद्ध्वस्त करण्यासाठी आयपीएस अधिकारी आणि विभागीय आयुक्तांचा समावेश असलेली एसआयटी नियुक्त केली जाईल. राज्यात नेमके किती गौण खनिज उत्खनन झाले, याचा खरा आकडा समोर येण्यासाठी संपूर्ण राज्याचे ईटीएस सर्वेक्षण केले जाईल. अवैध धंदे कोणाच्या तरी आशीर्वादाशिवाय चालत नाहीत, असे नमूद करत बावनकुळे यांनी मागील ५ वर्षांत अवैध कामांना मूकसंमती देणाऱ्या अधिकाऱ्यांचीही विभागीय चौकशी करण्याचे आदेश दिले.

...तर नोंदणी कायमस्वरुपी रद्द

अवैध वाहतूक करणारा ट्रक तीन वेळा पकडला गेल्यास आरटीओमार्फत त्या वाहनाचे रजिस्ट्रेशन कायमस्वरूपी रद्द केले जाईल आणि पुढील अधिवेशनापर्यंत राज्यातील खाणींच्या अवैध उत्खननाचा संपूर्ण तपशील देणारी 'श्वेतपत्रिका' (पुस्तक) सभागृहासमोर मांडली जाईल असेही त्यांनी स्पष्ट केले.

आरएमसी प्लँटचे होणार 'कॅल्क्युलेशन'- मुंबई आणि परिसरात सुरू असलेल्या 'रेडी मिक्स काँक्रीट' (आरएमसी) प्लँटमधून जेवढे काँक्रीट बाहेर पडले, त्यासाठी किती खडी आणि वाळू लागली याचे गणित मांडले जाईल. रॉयल्टीचा भरणा आणि प्रत्यक्षातील वापर यामध्ये मोठी तफावत आढळत असून, त्यातून कोट्यवधींचा महसूल बुडाल्याचा संशय मंत्र्यांनी व्यक्त केला.

शेतकऱ्यांना दिलासा

या चर्चेदरम्यान आमदार दिलीप लांडे, राजू खरे आणि नाना पटोले यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर बोलताना मंत्री म्हणाले की, जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांनी समन्वयाने पुढील तीन दिवस विशेष मोहीम राबवून अवैध उत्खनन तात्काळ बंद करावे. मात्र, ज्यांच्याकडे वैध परवानग्या आहेत, त्यांचे काम बंद पडणार नाही याची काळजी घेतली जाईल. दरम्यान, शेतकऱ्यांनी स्वतःच्या वापरासाठी किंवा घरकुलासाठी शेतातून मुरूम-रेती काढल्यास त्यांच्यावर कोणतीही कारवाई करू नये, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

१३७ कोटींच्या दंडाचीही होणार चौकशी

आमदार जितेंद्र आव्हाड यांनी



भिवंडीतील एका खाणीवर प्रलंबित असलेल्या १३७ कोटी रुपयांच्या दंडाचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर महसूल मंत्र्यांनी या प्रकरणाची तातडीने माहिती घेऊन वसुलीसाठी कठोर पावले उचलण्याचे आश्वासन दिले.

## संपादकीय....

### सरकार संवेदनशील

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सध्याची जागतिक परिस्थिती, भारताची रणनीती आणि सरकारची भूमिका स्पष्ट केली. यापूर्वी, सरकारने संकेत दिले होते की ते मध्य-पूर्वेतील संकटाबाबत सतर्क असून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. गेल्या रविवारी, पंतप्रधान मोदींसोबत झालेल्या एका उच्चस्तरीय मंत्रिमंडळ बैठकीत पश्चिम आशियातील वाढत्या तणावाचा भारताच्या तेल आयातीवर, खतांच्या पुरवठ्यावर आणि व्यवसायावर होणाऱ्या संभाव्य परिणामांवर चर्चा झाली. या बैठकीत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इराणसोबतच्या अमेरिका-इस्रायल संघर्षातून निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा घेतला. जीवनावश्यक वस्तूंची उपलब्धता कायम राखण्यासाठी अल्पकालीन, मध्यमकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. याव्यतिरिक्त, भविष्यात शेतकऱ्यांना खतांची उपलब्धता अखंडित राहावी यासाठी खतांच्या पर्यायी स्रोतांवरही विचारमंथन करण्यात आले.पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संघर्षावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज लोकसभेत एक महत्त्वाचे निवेदन केले. इराण आणि इस्रायल यांच्यातील वाढता तणाव आणि त्याचे जागतिक परिणाम लक्षात घेता, पंतप्रधान मोदींचे हे भाषण महत्त्वपूर्ण होते. जागतिक परिस्थिती वेगाने बदलत आहे, ज्यामुळे देशाची अर्थव्यवस्था, ऊर्जा सुरक्षा आणि परराष्ट्र धोरणावर संभाव्य परिणाम होऊ शकतो. आपल्या भाषणात पंतप्रधान मोदींनी संभाव्य जागतिक इंधन संकट, जागतिक पुरवठा साखळी आणि स्थिरतेसंदर्भात चर्चा केली. तसेच कोरोनाच्या परिस्थितीसारखं आपण तयार राहायला हवे. या युद्धामुळे भारतासमोर अभूतपूर्व आव्हानेही उभी राहिली आहेत. ही आव्हाने आर्थिक, राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित आणि मानवतावादी आहेत. युद्धग्रस्त आणि युद्धग्रस्त देशांशी भारताचे व्यापक व्यापारी संबंध आहेत. ज्या प्रदेशात हे युद्ध सुरू आहे, तो प्रदेश जगभरातील इतर देशांसोबतच्या आपल्या व्यापारासाठी एक महत्त्वाचा मार्ग आहे. विशेषतः हा प्रदेश आपल्या कच्च्या तेलाची आणि वायूची मोठी गरज भागवतो . सरकार संवेदनशील, दक्ष असून सर्वतोपरी मदत करण्यास तयार आहे. भारताला होर्मुझच्या सामुद्रधुनीतून कच्चे तेल, गॅस आणि खते यांसारख्या जीवनावश्यक वस्तू मोठ्या प्रमाणात मिळतात. युद्धानंतर, या सामुद्रधुनीतून होणारी जलवाहतूक अधिकाधिक आव्हानात्मक झाली आहे. असे असूनही, पेट्रोल, डिझेल आणि गॅसच्या पुरवठ्यावर लक्षणीय परिणाम होणार नाही.

# भोंदूगिरी, सत्तेची छाया आणि सत्य दडपण्याचा खेळ : अशोक खरात प्रकरणातून उघड होणारे भयावह वास्तव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आजच्या लोकशाही व्यवस्थेत सर्वसामान्य नागरिकांचा शासनावर असलेला विश्वास हा सर्वात मोठा आधारस्तंभ मानला जातो. परंतु जेव्हा सत्ताधारीच त्या विश्वासाला तडा देणाऱ्या घटनांमध्ये गुंतलेले दिसतात, तेव्हा प्रश्न केवळ एका व्यक्तीचा राहत नाही, तर तो संपूर्ण व्यवस्थेच्या प्रामाणिकतेवर उभा ठाकतो. भोंदू अशोक खरात प्रकरणाने सध्या राज्याच्या राजकारणात अशीच खळबळ उडवली आहे. या प्रकरणात अर्धे मंत्रिमंडळ अडकण्याच्या भीतीने ते दडपण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा रंगू लागली आहे, आणि हीच बाब अधिक गंभीर आहे. अशोक खरात नावाचा एक तथाकथित गुरु किंवा बाबा आपल्या चमत्कारांच्या, अंधश्रद्धेच्या आणि मानसिक प्रभावाच्या जाळ्यात अनेकांना अडकवत होता, हे आता उघड झाले आहे. मात्र, या भोंदूगिरीमागे केवळ एक व्यक्ती नसून, त्याला मिळालेली राजकीय पाठराखण ही अधिक धक्कादायक आहे. समाजातील काही प्रभावशाली व्यक्ती, अधिकारी आणि राजकीय नेते यांचे त्याच्याशी असलेले संबंध हळूहळू समोर येत आहेत आणि इथेच प्रश्न निर्माण होतो. जर सत्तेतील लोकच अशा भोंदूगिरीला खतपाणी घालत असतील, तर सामान्य माणसाने कोणावर विश्वास ठेवायचा?

या प्रकरणात सर्वात धोकादायक बाब म्हणजे, सत्य बाहेर येऊ नये म्हणून चाललेले प्रयत्न. तपास यंत्रणांवर दबाव, पुरावे दडपण्याचा प्रयत्न, साक्षीदारांना धमकावणे, हे सगळे चित्र लोकशाहीला कलंक लावणारे आहे. जेव्हा अर्धे मंत्रिमंडळ अडकण्याची भीती ही चर्चा पुढे येते, तेव्हा हे स्पष्ट होते की हा केवळ एक गुन्हा नसून, सत्तेच्या उच्च पातळीवर पोहोचलेला भ्रष्टाचाराचा जाळ आहे. वृत्तपत्रांनी नेहमीच जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले आहे. त्याच परंपरेत या प्रकरणाकडे पाहिले, तर ही घटना केवळ गुन्हेगारी स्वरूपाची नाही, तर सामाजिक आणि राजकीय अधःपतनाचे प्रतीक आहे. अंधश्रद्धा आणि भोंदूगिरीविरोधात कायदे असतानाही, अशा व्यक्तींना राजकीय आश्रय मिळतो, ही वस्तुस्थिती अत्यंत वेदनादायक आहे. महाराष्ट्र ही संतांची, विचारवंतांची भूमी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांपर्यंत, या भूमीने नेहमीच विवेक, विज्ञाननिष्ठा आणि सामाजिक न्याय यांचा पुरस्कार केला आहे. मग आज त्याच महाराष्ट्रात भोंदूगिरीला इतकी मोकळीक कशी मिळते? याचे उत्तर शोधताना आपण सत्तेच्या राजकारणाकडे दुर्लक्ष करू शकत नाही.






– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde
@gmail.com

अशोक खरातसारख्या व्यक्तींना फोफावण्यासाठी केवळ लोकांची अंधश्रद्धा कारणीभूत नसते; त्यामागे सत्तेचा आशीर्वाद असतो. जेव्हा मंत्री, आमदार किंवा प्रभावशाली नेते अशा व्यक्तींच्या कार्यक्रमांना हजेरी लावतात, त्यांचे गौरव करतात, तेव्हा समाजात एक चुकीचा संदेश जातो की, ही व्यक्ती खरोखरच प्रभावशाली आहे आणि मग सामान्य माणूसही त्या प्रभावाला बळी पडतो. या प्रकरणात जर खरोखरच मंत्रिमंडळातील काही सदस्य अडकत असतील, तर तपास अधिक पारदर्शक आणि कठोर होणे आवश्यक आहे. पण दुर्दैवाने, सध्या दिसणारी परिस्थिती उलट आहे. प्रकरण दाबण्याचा प्रयत्न होत असल्याच्या चर्चा म्हणजे लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे. कारण, जर सत्ताधारीच स्वतःला वाचवण्यासाठी तपासात हस्तक्षेप करत असतील, तर न्यायव्यवस्थेवरचा विश्वास कोसळतो. यापूर्वीही देशात अनेक घोटाळे, प्रकरणे समोर आली आहेत, जिथे सुरुवातीला सत्य दडपण्याचा प्रयत्न झाला पण शेवटी सत्य बाहेर आलेच. कारण सत्याला कितीही दाबण्याचा प्रयत्न केला, तरी ते कधी ना कधी उघड होतेच. अशोक खरात प्रकरणातही हेच होईल, अशी जनतेची अपेक्षा आहे. मात्र, त्यासाठी समाजाची जागरूकता आणि माध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

आजच्या डिजिटल युगात माहिती लपवणे इतके सोपे राहिलेले नाही. सोशल मीडिया, स्वतंत्र पत्रकारिता आणि जनतेची सतर्कता यामुळे अनेक गोष्टी उघडकीस येतात पण याचबरोबर खोटी माहिती पसरवण्याचाही धोका असतो. त्यामुळे या प्रकरणात सत्य आणि अफवा यामधील फरक ओळखणे आवश्यक आहे. तरीही, जे प्रश्न उभे राहिले आहेत, त्यांची उत्तरे मिळणे आवश्यक आहे. या प्रकरणातून आणखी एक महत्त्वाचा मुद्दा समोर येतो, तो म्हणजे अंधश्रद्धेविरोधातील लढा. महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलनासाठी अनेक वर्षे कार्य झाले आहे पण तरी-ही अशा भोंदूंचा प्रभाव टिकून आहे, याचा अर्थ अजूनही समाजात जागृतीची गरज आहे. शिक्षण, विज्ञाननिष्ठ विचार आणि सामाजिक जबाबदारी यांचा प्रसार केल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. राजकीय दृष्टिकोनातून पाहिले, तर हे प्रकरण सत्ताधाऱ्यांसाठी एक मोठी कसोटी आहे. जर त्यांनी पारदर्शक आणि निष्पक्ष तपासाला सहकार्य केले, तर त्यांचा विश्वास टिकू शकतो. पण जर प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला, तर जनतेचा रोष अधिक वाढेल. कारण आजचा मतदार जागरूक आहे, प्रश्न विचारतो आणि चुकीच्या गोष्टींना माफ करत नाही.

विरोधकांची भूमिकाही येथे महत्त्वाची ठरते. त्यांनी या प्रकरणाचा केवळ राजकीय फायदा घेण्याऐवजी, सत्य बाहेर येण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. कारण हा प्रश्न केवळ सत्तेचा नाही, तर संपूर्ण व्यवस्थेच्या प्रामाणिकतेचा आहे. शेवटी, या प्रकरणाकडे केवळ एक घोटाळा म्हणून न पाहता, एक मोठा सामाजिक संदेश म्हणून पाहणे गरजेचे आहे. भोंदूगिरी, अंधश्रद्धा आणि सत्तेचा गैरवापर याविरोधात समाजाने एकत्र येणे आवश्यक आहे. कारण जर आपण आज आवाज उठवला नाही, तर उद्या अशा घटना आणखी वाढतील. अशोक खरात प्रकरण हे एक आरसा आहे, जो आपल्याला आपल्या समाजाचे आणि व्यवस्थेचे खरे स्वरूप दाखवत आहे. आता प्रश्न हा आहे की आपण त्या आरशात दिसणाऱ्या वास्तवाला स्वीकारून बदल घडवणार आहोत का, की पुन्हा एकदा डोळेझाक करून पुढे जाणार आहोत? लोकशाहीची खरी ताकद ही जनतेच्या सजगतेत असते आणि आज ती सजगता दाखवण्याची वेळ आली आहे. सत्य दडपण्याचा प्रत्येक प्रयत्न हा लोकशाहीवर आघात असतो. त्यामुळे या प्रकरणात निष्पक्ष, पारदर्शक आणि निर्भीड तपास होणे हीच काळाची गरज आहे.

# ‘महालक्ष्मी सरस’ महिलांसाठी बाजारपेठेचा मोठा ब्रँड : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : महालक्ष्मी सरस प्रदर्शन हे केवळ विक्रीचे ठिकाण नसून महिला बचत गटांसाठी प्रभावी बाजारपेठ म्हणून कार्य करत आहे. राज्यातील ३६ जिल्ह्यात उमेद मॉल उभारण्यात येत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

या प्रदर्शनाला नागरिकांचा वाढता प्रतिसाद मिळत असून महालक्ष्मी सरस हा प्रदर्शनाचा ब्रँड अधिक मजबूत होत आहे. राज्यात शंभर कोटी रुपयाचा व्यवहार बचत गटाच्या माध्यमातून होत असल्याचेही मुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले केले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी 'महालक्ष्मी सरस २०२६' प्रदर्शनाला भेट दिली. या प्रसंगी महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, अर्थ व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल, आमदार सर्वश्री कृपाल तुमाने, कृष्णा खोपडे, चरणसिंग ठाकूर आदी लोकप्रतिनिधी उपस्थिती होती.

महालक्ष्मी सरस २०२६ मध्ये सुमारे ४०४ स्टॉल्स उभारण्यात आले असून आतापर्यंत १० कोटी रुपयांची विक्री झाली आहे. ही विक्री पुढील काळात आणखी वाढण्यासाठी शासन प्रयत्नशील राहील अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

राज्यात ३ ठिकाणी महालक्ष्मी सरस प्रदर्शन भरविण्यात येते आणि या माध्यमातून सुमारे १०० कोटी रुपयांची उलाढाल होत असते यामुळे महिलांच्या उद्योगाना मोठी चालना मिळत असून पुढे त्यांना अधिक संधी निर्माण करून देण्याचे काम शासन करणार आहे. ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून महिला सशक्तीकरणासाठी विविध योजना राबविण्यात येत असून महिला अर्थव्यवस्थेच्या प्रमुख घटक बनल्या आहेत, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

राज्यात 'लखपती दीदी'अभियानांतर्गत १ कोटी महिलांना सक्षम करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात १३ जिल्ह्यांमध्ये 'उमेद मॉल' उभारण्यात येणार असून टप्प्याटप्प्याने सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये हे मॉल उभारण्याचा शासनाचा मानस असल्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी आपल्या मनोगत व्यक्त करताना सांगितले. नागपूर येथे महालक्ष्मी सरस प्रदर्शनाचे आयोजन अत्यंत उत्तम झाले असून यासाठी १०० पैकी १०० गुण आयोजकांना देतो आणि महिलांसाठी महालक्ष्मी सरस च्या माध्यमातून मिळणारी हक्काची बाजारपेठ दरवर्षी नागपुरात उपलब्ध करून दिली जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

महिलांचे कौशल्य वाढविणे, त्यांच्या उत्पादनांचे ब्रँडिंग व मार्केटिंग करणे आणि त्यातून त्यांची उत्पादने परदेशात पाठविण्यासाठी शासन काम करनार असल्याचेही त्यांनी सांगितले.

नवसखी उद्योगिनी योजनेच्या माध्यमातून महिलांना आर्थिक सहाय्य मिळवून देण्याचे काम मंत्री बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाने योजना आखून १ लाख रुपये महिला बचत समूहाना उपलब्ध करून दिले. आणि त्यातून खऱ्या अर्थाने महिलांना आर्थिक सक्षम करण्याचे काम होत आहे असे मत राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी व्यक्त केले.

यावेळी नागपूर जिल्हा परिषदेने राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचे मुख्यमंत्री फसनवीस यांनी दीदी की रसोई उपहारगृह, प्रोजेक्ट ड्रीम १०० विलेज लायब्ररी, १४ आय सी टी लॅब झेड. पी. स्कूल, ए आय लॅब ऑन व्हील- ज्ञानरथ, सुपर ४० अंगणवाडी, गुरुकुल ए आय लॅब ४८ अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांचे लोकार्पण केले आणि केलेल्या कामांचे त्यांनी कौतुक केले. तसेच भविष्यात जिल्हा परिषदेमार्फत १०० पेक्षा अधिक वाचनालये उभारण्यात येणार असून या उपक्रमाचा देखील शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला.

सोबतच महालक्ष्मी सरस येथील महिला बचत गटांच्या स्टॉल्सला भेट देत महिलांशी संवाद साधला. त्यांच्या उत्पादनांची विक्री, बाजारपेठेतील प्रतिसाद आणि येणाऱ्या अडचणी जाणून घेतल्या.

तसेच उमेद अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर, मनपा आयुक्त तथा जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, उमेद अभियानाचे मुख्य परिचलन अधिकारी निखिल ओसवाल, प्रकल्प संचालिका अंशूजा गराटे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी कपिलनाथ कलोडे, सर्व विभाग प्रमुख गटविकास अधिकारी उमेद अभियानाचे जिल्हा व तालुका कक्षातील सर्व अधिकारी कर्मचारी आणि मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

प्रसंगी आभार अतिरिक्त मुख्य कार्यपालनअधिकारी डॉ. कमलकिशोर फुटाणे यांनी मानले, तर सूत्रसंचालन अमोल बाविस्कर यांनी केले.

# सावधान! महाराष्ट्रासह १५ राज्यांत पावसाचा थरार; ५० च्या वेगाने वाहणार वादळी वारा, आयएमडी चा हाय अलर्ट!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पूर्व आणि उत्तर भारतात पुन्हा एकदा पावसाचा कहर होणार आहे. हवामान विभागाने बिहार, झारखंड आणि राजस्थानसह १५ राज्यांसाठी २३ मार्च ते २६ मार्च दरम्यान पावसाचा इशारा दिला आहे. या काळात ताशी ५० किलोमीटर वेगाने वादळी वारे वाहतील. शेतकऱ्यांना घराबाहेरील कामे टाळण्याचा आणि सावधगिरी बाळगण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

या वादळामुळे अनेक भागांमध्ये पिकांचे नुकसान होण्याचीही शक्यता आहे. या मुसळधार पावसामुळे तापमान ४ ते ५ अंश सेल्सिअसने कमी होऊ शकते. याव्यतिरिक्त, पाचपेक्षा जास्त राज्यांमध्ये गारपिटीचा इशारा देण्यात आला आहे. चला तर मग, २३ मार्च रोजी इतर राज्यांमध्ये जिल्हावार हवामान कसे असेल ते पाहूया.

मार्च महिन्याच्या सुरुवातीला मुंबईत आलेली तीव्र उष्णतेची लाट हळूहळू ओसरत आहे. संपूर्ण महाराष्ट्रात तापमान कमी होत असून, अनेक भागांमध्ये पाऊस पडला आहे. दरम्यान, बुधवारी कोल्हापूरमध्ये गारपिटीने हाहाकार माजवला, ज्यामुळे रस्त्यांवर गारांचे ढीग साचले. यापूर्वी मंगळवारी, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यांमध्ये झालेल्या गारपिटीमुळे पिकांचे मोठे नुकसान झाले. हवामान विभागाने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातही पुढील दोन दिवस पाऊस आणि गारपिटीचा अंदाज वर्तवला आहे. या अवकाळी हवामानाच्या आपत्तीमुळे फळबागा आणि रब्बी पिकांना मोठा फटका बसला आहे.


पिकांचे मोठे नुकसान

धाराशिव जिल्ह्यात, विशेषत: लोहारा शहर आणि आसपासच्या तालुक्यांमध्ये सायंकाळी मेघगर्जना आणि जोरदार गारपिटीमुळे लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. परिसरातील सोसाट्याच्या वाऱ्याने उभी पिके उन्मळून पडली, तर गारपिटीने कच्चे आंबे उन्मळून पडले आणि द्राक्षांच्या घडांचे नुकसान झाले, ज्यामुळे मोठे नुकसान झाले. लातूर जिल्ह्याच्या काही भागांमध्ये अवकाळी पावसाने थैमान घातले.दोन ते तीन दिवसांनी हवामान पुन्हा बदलेल

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील ४८ तासांत ढगाळ आकाशामुळे विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या गारपिटीचीही शक्यता आहे. तथापि, हा दिलासा अल्पकाळ टिकेल; दोन ते तीन दिवसांनी हवामान पुन्हा बदलेल, ज्यामुळे तापमानात वाढ होऊन उष्णता वाढेल. अवकाळी पाऊस आणि गारपिटीच्या शक्यतेमुळे काढणीसाठी तयार असलेल्या पिकांचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे, हवामान तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांची आणि बागांची योग्य काळजी घेण्याचा सल्ला दिला आहे.

वादळी पावसाची शक्यता

विदर्भ, मराठवाडा, खानदेश आणि मध्य महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये दुपारपासून २० मार्चपर्यंत ढगाळ आकाश, वादळी पाऊस आणि गारपिटीची शक्यता आहे. १८ ते २० मार्च दरम्यान वादळी पावसाची तीव्रता आणि क्षेत्र वाढण्याची शक्यता आहे. या काळात विदर्भ, म



राठवाडा, खानदेश आणि मध्य महाराष्ट्रात अनेक ठिकाणी ढगाळ आकाश आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. काही जिल्ह्यांमध्ये गारपिटीची शक्यता आहे. हवामान विभागाने २१ मार्चपासून हवामान स्थिर होण्याचा अंदाज वर्तवला आहे.

२३ मार्च रोजी मुंबईत हलक्या पावसाची शक्यता

नागरिक आणि शेतकऱ्यांनी मेघगर्जनेसह पाऊस आणि विजांच्या कडकडाटादरम्यान स्वत:ची आणि आपल्या पाळीव प्राण्यांची सुरक्षितता सुनिश्चित करावी. तसेच झाडांखाली, पत्र्याच्या शेडखाली, तसेच ट्रान्सफॉर्मर, विजेचे खांब आणि वीजवाहिन्यांजवळ उभे राहणे टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, मुंबई शहर आणि उपनगरातील हवामानातही बदल झाला आहे. दरम्यान, २३ मार्च रोजी मुंबईत हलक्या पावसाची शक्यता आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# नव तेजस्विनी महोत्सवाचे अप्पर जिल्हाधिकारी गणेश नि-हाळी यांच्या हस्ते उद्घाटन

## प्रदर्शनात ३६ स्टॉलमध्ये खाद्यपदार्थांसह दैनंदिन वापराच्या वस्तूंची विक्री




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : मावीमच्या ५१ व्या वर्धापन दिनानिमित्त नव तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पांतर्गत महिला बचत गट उत्पादित विविध वस्तू व खाद्यपदार्थ विक्री आणि प्रदर्शनाचे उद्घाटन अप्पर जिल्हाधिकारी गणेश नि-हाळी यांच्या हस्ते झाले.

**या महोत्सवात महिला बचत गटांना बँकांच्या माध्यमातून मोठे आर्थिक पाठबळ मिळाले. बँक ऑफ इंडिया कडून २४ गटांना एकूण १ कोटी ७६ लाखांचे धनादेश, बँक ऑफ महाराष्ट्र तर्फे कामधेनू व राजमाता गटांना १ कोटी १४ लाखांचे धनादेश तर आयसीआयसीआय बँकेतर्फे १०५ स्वयंसहायता महिला बचत गटांना तब्बल ४ कोटी ५० लाखांचे धनादेश वितरण करण्यात आले.**

या प्रसंगी जिल्हा समन्वय अधिकारी मन्सूर पटेल, नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक नितीन शेळके, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा माविमचे राजकुमार पवार, विभागीय व्यावसाय सल्लागार सिद्धाराम माशाळे, तालुका व्यवस्थापक रणजित शेंडे व माविम अधिकारी प्रशांत गायकवाड उपस्थित होते.

उद्घाटन प्रसंगी अप्पर जिल्हाधिकारी गणेश नि-हाळी यांनी महिलांना शुभेच्छा देताना सांगितले की, पुढील दोन दिवसांत मी स्वतः माझ्या कुटुंबासह येथे येऊन खाद्यपदार्थांचा आस्वाद घेईन. उपस्थितांनीही स्टॉलला भेट देऊन महिलांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रदर्शनात एकूण ३६ स्टॉल उभारण्यात आले असून त्यात खाद्यपदार्थांसह दैनंदिन वापराच्या वस्तूंची विक्री सुरू आहे. महिलांच्या उद्यमशीलतेला चालना देणारा हा उपक्रम स्वावलंबनाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरेल तर धनादेशातून मिळालेले हे पाठबळ महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी उपयुक्त ठरेल, असे माविमच्या वतीने सांगण्यात आले.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. महिलांनी सामूहिक गीत गायन करून वातावरण भारावून टाकले.

---

## अलिबागमधील वावे गावात श्रीरामजन्मोत्सव सोहळा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वावे अलिबाग/प्रतिनिधी : सालाबादप्रमाणे मुक्काम -वावे , तालुका- अलिबाग , जिल्हा -रायगड, येथे चैत्र शु .९ , श्री शालिवाहन शके १९४८ , गुरुवार दिनांक - २६ मार्च २०२६ रोजी ७७ व्या श्रीरामजन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे, सकाळी ९.०० वाजता श्रीरामप्रासादिक भजन मंडळ वावे : बुवा - श्री बळीराम गावंड ( संगीत विशारद बाबुराव वाघमारे यांचे शिष्य ) तसेच मृदंगमणी - श्री हरिश्चंद्र नथुराम गावंड , श्री दामोदर गावंड , श्री जनार्दन गावंड ( संगीत विशारद बाबुराव वाघमारे यांचे शिष्य ) , चालक श्री दिलीप पाटील , श्री संदीप गायकर , मॅनेजर श्री वसंत गावंड यांचे सुश्राव्य भजन होणार आहे . श्रीरामप्रभुंच्या जन्मसोहळ्याचे पोथीवाचन सकाळी - १०.०० ते १२.३० यावेळेत होणार आहे. श्रीरामनवमी दिवशी दुपारी १२.३० वाजता मर्यादापुरुषोत्तम श्रीरामप्रभुंचा जन्मोत्सवाचा सोहळा भक्तिभावे संपन्न होणार आहे. तसेच भक्तजनांसाठी महाप्रसादाची व्यवस्था दुपारी १ .०० ते ४.०० यावेळेत असणार आहे. तसेच भक्तजनांच्या मनोजनार्थ पंचक्रोशीतील : बेलोशी, महाजने , आंदोशी, उसर , वळवली , आंबेपूर , या सहा भजनी मंडळांचे कार्यक्रम दुपारी १ ते रात्रौ ७ यावेळेत होणार आहेत , त्यामुळे भक्तजनांना संगीतमय मधुर स्वरांचा आनंदमय आस्वाद मिळणार आहे . श्रीरामप्रभूंची पालखी रात्रौ ९.०० वाजता विविध सजावटीने सजविलेला श्रीरामरथ चलचित्र पालखी सोहळा सोबत देवेश बेंजोपथक वावे , शिवबा म्युझिकल ग्रुप फणसापुर, यांच्या वाद्य व म्युझिकचा नयनरम्य आस्वाद, तसेच विभागातील ताशापथक हरिश्चंद्र सांदणकर ,आत्माराम थळे, व इतर मित्रमंडळी यांचा ताशांचा सुंदर स्वर घुमणार आहे आणि पालखीसोबत वावे ग्रामस्थ व पंचक्रोशीतील आंदोशी, चिंचोटी , घोटवडे , बेलोशी , महाजने, या लेझीम पथकांची रंगत पहायला मिळणार आहे, अशी भव्य पालखी मिरवणुक गावातुन काढण्यात येणार आहे. पालखीसोबत : बोरपाडा , कुंठयाची गोठी, आंदोशी , बेलोशी , महाजने, या पंचक्रोशीतील व गावातील टाळमृदूंगधारी वारकरीभजने व भावगीते होणार आहेत . डेकोरेशन व ध्वनी : गावदेवी साउंड सर्वीस व डेकोरेटर आंदोशी यांचे आहे . वेशभूषा - स्वराली ड्रेसेस थेरोंडा सौ . विनोदिनी कोंडे व रंगभूषा -महेंद्र गावंड यांची असणार आहे . तसेच वेषभुषाधारक भाविक ग्रामस्थ हे श्रीरामप्रभूंच्या पालखीचे प्रमुख आकर्षण असणार आहे. श्रीरामप्रभूंच्या पालखीसोहळ्यात गुलालाची चौफेर उधळण करून ग्रामस्थ आपला आनंद साजरा करतात , तसेच जय हनुमान लाठीकाठी आखाडा भोनंग यांचे , लाठी - काठी व मल्लखांब अशा मैदानी खेळांची थरारक प्रात्यक्षिके श्रीराम मंदिराच्या प्रांगणात दाखविण्यात येणार आहेत. आकर्षक व मनमोहक रोषणाईने श्रीराममंदिर उजळून निघणार आहे. टाळमृदूंगाच्या नादात भक्तीमय वातावरणात या अविस्मरणीय अशा श्रीरामप्रभुंच्या भक्तिमय आनंद जन्मोत्सव सोहळ्याचा व तीर्थप्रसादाचा तसेच महाप्रसादाचा लाभ सर्वभाविकांनी घ्यावा व याचीदेही ,याची डोळा अशा या भक्तीमय सोहळ्यात सहभागी होऊन या सोहळ्याचा आनंद आपण सर्वानी द्विगुणीत करावा असे आवाहन वावे ग्रामस्थांच्यावतीने : श्री दिनेश हरिश्चंद्र तुरे ( मुक्त - पत्रकार व वृत्तपत्रलेखक ) यांनी केले आहे. तसेच नाट्यरसिकांच्या मनोरंजनार्थ शनिवार दिनांक २८ मार्च २०२६ रोजी रात्रौ १०.०० वाजता दिल्या घरी सुखी रहा..... या दोन अंकी सामाजिक व कौटुंबिक नाटकाचा प्रयोग सादर होणार आहे. अशा प्रकारे यादरम्यान विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन वावे ग्रामस्थांतर्फे करण्यात आले आहे . श्रीरामप्रभुंच्या चरणी नतमस्तक होऊन अलोट भक्ती द्वारे या मंगलमय भक्तीमय सोहळ्याचा आनंद आपण सर्वानी लुटूया ! एक ही नारा जय श्रीराम ! एकही नाम जय श्रीरामप्रभु ! श्रीराम जय राम ! जय जय राम !!

---

## अंध शाळेतील कार्यक्रमात ब्रेल लिपीतील दोन पुस्तके प्रकाशित







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी मुंबई/पी. डी. पाटील : गेली २७ वर्षे सातत्याने मुशाफिरी सदरातून स्तंभलेखन करणाऱ्या लेखक पत्रकार राजेंद्र घरत यांच्या 'अर्थ असा आणि तसा' व 'शेजारी आणि शेजारधर्म' या ब्रेल लिपीतील अनुक्रमे एकतिसाव्या व बत्तीसाव्या पुस्तकांचे प्रकाशन रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यात असणाऱ्या घराडी येथील स्नेहज्योती अंध निवासी विद्यालयात २२ मार्च रोजी पार पडले. यावेळी विचारमंचावर शिवव्याख्याते प्रा. रविंद्र पाटील, सामाजिक कार्यकर्ते आणि ज्येष्ठ रंगकर्मी रविंद्र औटी, अंधशाळेच्या मुख्याध्यापिका प्रतिभा प्रणव सेनगुप्ता उपस्थित होत्या.

नवी मुंबईतील शिवतुतारी प्रतिष्ठान - कविता डॉट कॉम यांच्या पुढाकाराने आयोजित या कार्यक्रमात बोलताना प्रा. रविंद्र पाटील आणि रविंद्र औटी यांनी इतक्या दुर्गम भागात स्नेह ज्योती शाळेने चालवलेल्या अंधसेवेची प्रशंसा केली आणि या शाळेमध्ये राजेंद्र घरत यांच्यामुळे येता आले, येथील मुलांचे भावविश्व जाणून घेता आले, त्यांच्यासाठी सेवा देणारे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या हितगुज साधता आल्याबद्दल समाधान व्यक्त केले. अशी पुस्तके ब्रेल लिपीत गेल्यामुळे त्यातील भावना, विचार दृष्टीहीन विद्यार्थ्यांनाही वाचता येतील, डोळसांच्या जगात काय चालले आहे याचा अंदाज बांधता येईल असेही वक्त्यांनी नमूद केले. ही पुस्तके ब्रेल लिपीत रुपांतरीत करणाऱ्या मुख्याध्यापिका प्रतिभा सेनगुप्ता यांना विशेष धन्यवाद देण्यात आले. लेखक घरत यांनी मनोगतातून या शाळेशी आपले भावबंध गेल्या १८ वर्षांपासून जोडले गेले असून या वास्तूत आल्यावर अनोखी उर्जा लाभते असे सांगत याहीपुढे विविध मान्यवर व्यक्ती, संस्थाचालक यांना येथे आणायचा उपक्रम सुरुच ठेवू असा विचार बोलून दाखवला. नवी मुंबईत सिडको प्रदर्शनी केंद्रात अलीकडेच भरवण्यात आलेल्या बाल मराठी संमेलनात 'बाप माझा' ही स्वरचित कविता सादर करुन दहा हजाराचे शासकीय पारितोषिक पटकावणाऱ्या आठवीतील विद्यार्थी प्रसाद माळी याने यावेळी येथील दृष्टीहीन मुलांसमोर तीच कविता सादर करुन उपस्थितांना भावविभोर केले. सूत्रसंचालनाची बाजू नारायण लांडगे पाटील यांनी सांभाळली. काही दानशूर दात्यांनी पाठवलेल्या भेटवस्तू व अन्य मदत याप्रसंगी शाळेच्या कर्मचाऱ्यांकडे सोपवण्यात आली.

---

## कळंब येथील दक्षिण मुखी हनुमान मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह व शिवमहापुराण कथा सोहळ्याचे आयोजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कसबा पेठ येथील ऐतिहासिक दक्षिण मुखी हनुमान मंदिर येथे दि. २६ मार्च २०२६ गुरुवार ते २ एप्रिल २०२६ गुरुवार रोजी हनुमान जन्मोत्सवाचे औचित्य साधून भव्य अखंड हरिनाम सप्ताह, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण आणि शिवमहापुराण कथा ज्ञानयज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. या आध्यात्मिक सोहळ्यामुळे कळंब शहरासह परिसरात भक्तीमय चैतन्य पसरले आहे.

**या प्रसिद्ध कीर्तनकारांची मांदियाळी**

सप्ताहाच्या निमित्ताने दररोज रात्री ७ वाजता महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांच्या कीर्तन सेवा आयोजित करण्यात आल्या आहेत. यामध्ये ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडी, ह.भ.प. सोपान महाराज कनेरकर, ह.भ.प. दत्ता महाराज अंबिरकर (डिकसळ), ह.भ.प. आत्माराव महाराज शास्त्री, ह.भ.प. उमेश महाराज दशरथे आणि ह.भ.प. उल्हास महाराज सूर्यवंशी यांचे प्रबोधनात्मक कीर्तन होणार आहे.

**विशेष आकर्षण: शिवमहापुराण कथा**

या वर्षीच्या सोहळ्याचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे ह.भ.प. श्री.विनोद कृष्ण शास्त्री, नायगव्हाणकर श्रीधाम वृंदावन(कृष्णजन्मभूमी) जि. मथुरा उत्तर प्रदेश यांच्या रसाळ वाणीतून 'शिवमहापुराण कथा' श्रवणाची संधी भाविकांना मिळत आहे. तसेच दक्षिण मुखी मारुती भजनी मंडळ व सर्व गावकरी यांच्या मार्गदर्शनाखाली हा संपूर्ण सप्ताह संपन्न होत आहे.

सप्ताहामध्ये पहाटे काकडा भजन, सकाळी ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी शिवमहापुराण कथा आणि रात्री कीर्तन असा भरगच्च कार्यक्रम असणार आहे. हनुमान जन्मोत्सवाच्या दिवशी ह.भ.प. ज्ञानसिंधू संदीपान महाराज शिंदे - पाटील (जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था यांच्या काल्याच्या कीर्तनाने आणि महाप्रसादाने या सोहळ्याची सांगता होणार आहे. तरी या कार्यक्रमासाठी

भाविकांनी उपस्थित राहुन लाभ घ्यावा असे आवाहन

दक्षिण मुखी हनुमान मंदिर देवस्थान आणि कसबा पेठ ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे सर्व नियोजन करण्यात आले आहे. सर्व भाविकांनी या मंगलमयी सोहळ्याचा आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

---

**समता संघर्ष सांस्कृतिक मंचच्या उपक्रमातून कवींच्या सर्जनशीलतेला व्यासपीठ; रसिक श्रोत्यांची उत्स्फूर्त दाद**

## जागतिक कवी दिनानिमित्त कल्याणमध्ये रंगली कवितांची बहारदार मैफिल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी
मिलिंद जाधव



काव्यात्मक अभिव्यक्तीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि कवींच्या सर्जनशीलतेचा सन्मान करण्याच्या उद्देशाने समता संघर्ष सांस्कृतिक मंच यांच्या वतीने २१ मार्च २०२६ रोजी जागतिक कवी दिनानिमित्त कल्याण येथील म्हाडा पुनर्वसन कार्यालयात कवितांची रंगतदार मैफिल आयोजित करण्यात आली.या कार्यक्रमात मराठी साहित्यातील दिग्गज कवींच्या कवितांचे सादरीकरण करण्यात आले. तसेच सामाजिक, शैक्षणिक, प्रेम अशा विविध विषयांवरील स्वरचित कवितांनीही रसिकांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमात मिलिंद जाधव, अक्षय भोईर, सुरेखा पैठणे, सोनाली जाधव, रोहित जाधव, जगदेव भटू, नवनाथ रणखांबे, प्रज्ञा चव्हाण, प्रीती माने, संजय इधे, राजेश देवरुखकर, आनंद दोंदे, दुहिता जाधव आणि नूतन मोरे यांनी आपल्या कवितांद्वारे विविध भावविश्व रंगवले. प्रत्येक कवीने आपल्या कवितेची पार्श्वभूमी मांडत प्रभावी सादरीकरण केले, ज्याला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. कवितांबरोबरच गाण्यांच्या माध्यमातूनही कवींनी आपल्या भावना रसिकांसमोर व्यक्त केल्या. या मैफिलीमुळे संपूर्ण वातावरण काव्यमय झाले होते. अशा उपक्रमांमुळे मराठी साहित्याला चालना मिळत असून नवोदित कवींना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होत असल्याची भावना कवींनी व्यक्त केली. यावेळी गौतम जाधव, शैलेश दोंदे, डॉ. सुषमा बसवंत, श्रीकांत कांबळे, गणेश सोष्टे, अविनाश दोंदे, वैभव मोरे आणि आशा मेढे उपस्थित होते.

---

## शिवाजी मराठा सोसायटी लॉ कॉलेजतर्फे राज्यस्तरीय मूट कोर्ट स्पर्धा; पीईएस मॉडर्न लॉ कॉलेज विजेते



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : श्री शिवाजी मराठा सोसायटीच्या विधी महाविद्यालयातर्फे आयोजित छत्रपती श्री शिवाजी महाराज सातवी राज्यस्तरीय मूट कोर्ट स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेत पुण्याच्या पीईएस मॉडर्न लॉ कॉलेजने विजेतेपद पटकावले, तर डीईएस श्री नवलमल फिरोदिया लॉ कॉलेज उपविजेते ठरले.

शुक्रवार पेठेतील श्री शिवाजी मराठा सोसायटीच्या सभागृहात स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाचे न्यायाधीश न्यायमूर्ती संजय देशमुख यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे मानद सचिव मा. श्री. अण्णा थोरात होते.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण मुंबईचे उप धर्मादाय आयुक्त डॉ. राहुल चव्हाण यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हा न्यायाधीश आनंद होडावडे, संस्थेचे खजिनदार श्री. जगदीश जेधे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ड. एस. एन. वाकचौरे, श्री. पद्माकर पवार, ड. तानाजी घारे, श्री. रघुनंदन जाधव तसेच प्राचार्य डॉ. सागर शेळके उपस्थित होते.

स्पर्धेत मंजिरी मुरकुटे हिने 'सर्वोत्कृष्ट वादी वकील' हा किताब पटकावला, तर निशांत बाळसराफ याने 'उत्कृष्ट प्रतिवादी' म्हणून गौरव मिळविला.

उद्घाटन प्रसंगी बोलताना न्यायमूर्ती संजय देशमुख यांनी सांगितले की, ग्रामीण भागातून येऊनही वकिली क्षेत्रात यशस्वी होता येते; मात्र त्यासाठी जिद्द, चिकाटी आणि अपयश पचवण्याची क्षमता आवश्यक आहे. प्रभावी वकिली करण्यासाठी सक्षम शब्दसंग्रह आणि निरीक्षणशक्ती महत्त्वाची असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

अध्यक्षीय भाषणात मा. श्री. अण्णा थोरात म्हणाले की, विद्यार्थ्यांमधील कोर्टासमोरील भीती दूर करण्यासाठी आणि त्यांना प्रत्यक्ष न्यायालयीन प्रक्रियेचा अनुभव देण्यासाठी दरवर्षी मूट कोर्ट स्पर्धेचे आयोजन करण्यात येते.यावर्षी स्पर्धेत एकूण ३२ संघांनी सहभाग घेतला असून, महाराष्ट्रातील शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभल्याची माहिती प्राचार्य डॉ. सागर शेळके यांनी दिली.

दैनिक
यश सिद्धि न्यूज

मंगळवार दि. २४ मार्च २०२६


# गॅस टंचाईमुळे कंपन्या बंद; सवलतीचा प्रश्न मुख्यमंत्र्यांकडे मांडू : राधाकृष्ण विखे

## औद्योगक क्षेत्राला गॅस टंचाईचा फटका; अधिकाऱ्यांनी समन्वय साधून टंचाईबाबत केल्या सूचना



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अहिल्यानगर : औद्योगिक क्षेत्राला 'पीएनजी'चा (बंदिस्त वाहिन्यांद्वारे नैसर्गिक वायू) पुरवठा करण्यासाठी गॅस कंपन्यांनी युद्धपातळीवर त्रुटी दूर कराव्यात, जिल्हाधिकारी व एमआयडीसीच्या प्रादेशिक अधिकाऱ्यांनी यामध्ये समन्वय निर्माण करावा अशी सूचना पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी उद्योजकांच्या बैठकीत दिल्या. गॅस टंचाईमुळे उत्पादन बंद राहिल्यास त्याचा परिणाम कामगारांवर झाल्यास सवलती देण्याचा प्रस्ताव आपण मुख्यमंर्त्याकडे मांडू असेही आश्वासन त्यांनी दिले.

औद्योगिक क्षेत्राला जाणवत असलेल्या गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर उद्योजक अनंत देसाई यांच्या पुढाकारातून मंत्री विखे यांच्या उपस्थितीत असोसिएशन ऑफ अहमदनगर मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीज (आमी) या उद्योजकांच्या संघटनेची बैठक आज, रविवारी आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी मंत्री विखे बोलत होते.

जिल्हा महापौर ज्योती गाडे, महापालिका स्थायी समितीचे सभापती सुभाष लोंढे, जिल्हाधिकारी पंकज आशिया, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी गणेश राठोड, जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे, बीपीसीएलचे क्षेत्रीय अधिकारी मनोज जाधव, एचपीसीएलचे विक्री व्यवस्थापक ब्रिजेश कुमार, 'आमी'चे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ यांच्यासह अहिल्यानगर, सुपा, नेवासे, श्रीरामपूर येथील उद्योजक उपस्थित होते. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी बडे यांनी एलपीजीचा पुरवठा करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने १५ प्राधान्य क्षेत्र ठरवून दिली आहेत, असे सांगितले, त्यामध्ये औद्योगिक क्षेत्राचा समावेश नसल्याचेही उघड झाले.

औद्योगिक वापराच्या गॅस टंचाईमुळे अनेक कंपन्यांच्या उत्पादनावर परिणाम झाला आहे, याकडे उद्योजकांनी लक्ष वेधले. त्यावर 'पीएनजी'चा पुरवठा करण्यासाठी त्रुटी दूर करण्याचे सूचना मंत्री विखे यांनी दिल्या. सध्या 'पीएनजी'चा पुरवठा करण्यासाठी पाईप, मीटर उपलब्ध नसल्याच्या कंपन्या सांगतात, त्यामुळे पुरवठ्यात दिरंगाई होत आहे, मागणी करून दोन-दोन महिने अर्ज प्रलंबित राहतात, असे उद्योजकांनी सांगितले.

क्षेत्रीय अधिकारी जाधव यांनी गेल्या तीन महिन्यांपासून आम्ही पीएनजीचे जोड घ्यावेत म्हणून पाठपुरावा करत होतो, मात्र आता गॅस टंचाई जाणवू लागल्यानंतर एकदम मागणीत वाढ झाली आहे, त्यामुळे अडचणी निर्माण झाल्याचे सांगितले. औद्योगिक कंपन्यांचे तंत्रज्ञ यासाठी मदत करतील तसेच गॅस कंपन्यांनी मनुष्यबळ वाढवून रात्रंदिवस काम करावे, अशी सूचना विखे यांनी केली.

अनंत देसाई व 'आमी'चे अध्यक्ष खाकाळ यांनी गॅस टंचाईमुळे निर्माण झालेल्या अडचणी विशद केल्या. अरविंद पारगावकर, राजेंद्र कटारिया, प्रवीण बजाज, दिलीप अकोलकर, दौलत शिंदे, चिन्मय सूखठणकर, महेश इंदानी, सुनील कानवडे, राजेंद्र शुक्रे, तेजस इंगळे, सुहास भिंगारे, पुरुषोत्तम नावंदर, मयूर गवळी, नागराज बडगिरी, प्रवीण बोरले, रोहन गांधी, प्रवीण जुंद्रे, विकास पानसंबळ, वरूण भगत, दिनेश अग्रवाल, उदय खिलारी आदी उपस्थित होते.

**परप्रांतीय कामगार निघून जाण्याची भीती**

गॅस टंचाईमुळे कंपन्यांच्या उत्पादन प्रक्रियेवर परिणाम झाला आहे. कंपन्या कामगारांसाठी चालवत असलेल्या उपाहारगृहातून जेवण, नाश्ता मिळेनासा झाला आहे. त्यामुळे कामगार, विशेषत: परप्रांतीय कामगार निघून जाण्याची शक्यता आहे, याकडे उद्योजकांनी लक्ष वेधले. कंपन्यांमधील उपहारगृहांना ५० टक्के रॉकेल पुरवठा करण्याचे आश्वासन मंत्री विखे यांनी दिले.

**पाच दिवसांच्या आठवड्याचा पर्याय**

गॅस टंचाईमुळे उत्पादनावर परिणाम झाला आहे. त्यामुळे सरकारने सवलती द्याव्यात अशी मागणी उद्योजकांनी केली. त्यावर उद्योजकांनी तसा प्रस्ताव दिल्यास आपण मुख्यमंर्त्याकडे मांडू असे आश्वासन मंत्री विखे यांनी दिले. काही उद्योजकांनी ५ दिवसांचा आठवडा करण्याची मागणी केली. त्यावर विखे यांनी उद्योजकांच्या संघटना पुढे येऊन असा निर्णय स्वत: करू शकतात, असे स्पष्ट केले.

**खोदाई दर कमी करा, मनपाला सूचना**

महापालिकेच्या खोदाई परवानगी अभावी अहिल्यानगर शहरात बंदिस्त पाईपद्वारे गॅस पुरवठ्याचे ४० हजार कनेक्शन प्रलंबित असल्याकडे बीपीसीएलचे क्षेत्रीय अधिकारी मनोज जाधव यांनी लक्ष वेधले. महापालिकेचा खोदाई दर खूप जास्त आहे, गेल्या दोन-तीन वर्षापासून परवानगी प्रतीक्षेत असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. त्यावर मंत्री विखे यांनी महापालिकेने दर कमी करण्याचा निर्णय घ्यावा, अशी सूचना महापौर व स्थायी समितीच्या सभापतींना केली.

**एमआयडीसीतील अतिक्रमणे हटवा**

सुपा औद्योगिक क्षेत्रातील अतिक्रमणे साफ करण्यात आली. त्याच पद्धतीवर नगरच्या एमआयडीसीतील अतिक्रमणे साफ करावीत, अशा सूचना मंत्री विखे यांनी एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी गणेश राठोड यांना केली. पुन्हा याची आठवण करायला लावू नका, असेही त्यांनी बजावले. नगर एमआयडीसीमध्ये दादागिरी वाढत चालले आहे, त्यातून वातावरण खराब होत आहे, त्याचाही पोलिसांमार्फत बंदोबस्त करू असेही आश्वासन मंत्री विखे यांनी दिले.

## राष्ट्रवादी युवक काँग्रेस कळंब तालुकाध्यक्षपदी भिमा हगारे यांची नियुक्ती



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या युवक संघटनेत कळंब तालुक्यासाठी नव्या नेतृत्वाची घोषणा करण्यात आली असून भिमा हगारे यांची कळंब तालुकाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

ही नियुक्ती पक्षाचे धाराशिव जिल्हा निरीक्षक श्री. रविंद्र पाटील, जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील, ज्येष्ठ नेते श्री. जिवनराव गोरे, महिला जिल्हाध्यक्षा सौ. मनीषा पाटील तसेच युवक जिल्हाध्यक्ष श्री. शेखर घोडके यांच्या उपस्थितीत जाहीर करण्यात आली.

शेतकरी कुटुंबातून पुढे आलेले भिमा हगारे हे प्रा. श्रीधर (बाबा) भवर यांचे खंबीर व लढवय्ये शिलेदार म्हणून ओळखले जातात. त्यांच्या नियुक्तीमुळे कळंब तालुक्यात युवक संघटनेला नवे बळ मिळणार असल्याची भावना कार्यकर्त्या मध्ये व्यक्त होत आहे.

भिमा हगारे यांची निवड ही केवळ पद मिळवण्यापुरती मर्यादित नसून त्यांच्या निष्ठा, संघर्षशील वृत्ती आणि सातत्यपूर्ण कार्याची दखल असल्याचे पक्ष नेत्यांनी सांगितले.

त्यांच्या आक्रमक व निडर नेतृत्वामुळे कळंब तालुक्यातील राजकारणाला नवी धार मिळेल, तसेच सामान्य नागरिकांच्या हक्कांसाठी ते अधिक ताकदीने लढतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

या नियुक्तीबद्दल विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## मस्सा (खं ) येथील जि.प. शाळा धोकादायक; तात्काळ पाडकामाची मागणी, प्रशासनावर निष्क्रियतेचा आरोप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील मस्सा (खं ) येथील जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळेची इमारत अत्यंत धोकादायक स्थितीत असून तात्काळ पाडकाम करण्याची मागणी वारंवार नागरिकांकडून करण्यात येत आहे. या संदर्भात जिल्हा परिषद धाराशिवचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देऊनही अद्याप कोणतीही कार्यवाही न झाल्याने ग्रामस्थांमधून तिव्र संताप व्यक्त होत आहे.या बाबत चे निवेदन

बबुवान नरसिंग गोरे (रा. मस्सा (खं ), ता. कळंब) यांनी जिल्हा परिषदेचे मुख्याधिकारी यांना देऊन मागणी केली आहे. दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, संबंधित शाळेची इमारत जीर्ण व धोकादायक झाली असून कोणत्याही क्षणी दुर्घटना घडू शकते. विशेषतः या परिसरात लहान मुले खेळण्यासाठी जात असल्याने त्यांना गंभीर धोका निर्माण झाला आहे.

या प्रकरणी यापूर्वी दि.२८ एप्रिल २०२५ तसेच दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रशासनाकडे निवेदने देण्यात आली होती. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही, असा आरोप करण्यात आला आहे.

नागरिकांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले की, वेळेत उपाययोजना न केल्यास एखादी दुर्दैवी घटना घडू शकते. त्यामुळे संबंधित धोकादायक इमारत तात्काळ पाडून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची खात्री करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, या गंभीर प्रश्नाकडे प्रशासन किती गांभीर्याने लक्ष देते आणि तातडीने निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ? संबंधित मागणीस न्याय न मिळाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल असा ईशारा बब्रुवान गोरे यांनी निवेदनात दिला आहे.

**उपराष्ट्रपतींच्या उपस्थितीत निसर्गोपचार आश्रमाचा ८१ व्या स्थापना दिवस समारंभ संपन्न**




## निसर्गोपचार आश्रमाचे शारीरिक-मानसिक आरोग्याबरोबरच ग्रामीण विकासातही मोलाचे योगदान : उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : महात्मा गांधीजींनी स्थापन केलेल्या निसर्गोपचार आश्रमाने केवळ व्यक्तींना शारीरिक-मानसिक आरोग्यच प्रदान केले नाही, तर ग्रामीण विकासातही मोलाचे योगदान दिले आहे. ग्रामीण लोकांशी संस्थेने जोडून घेतलेले नाते आणि त्यांना शाश्वतता व स्वावलंबनाचे धडे देण्यासाठी देण्यात येत असलेले प्रशिक्षण अत्यंत प्रशंसनीय आहे, असे प्रतिपादन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

उरुळी कांचन (ता. हवेली) येथील निसर्गोपचार आश्रमाच्या ८१ व्या स्थापना दिवस कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राज्यपाल जिष्णू देव वर्मा, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश नारायण सिंह, राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार माऊली उर्फ ज्ञानेश्वर कटके, आश्रमाचे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. नारायण हेगडे, वैद्यकीय संचालक आणि विश्वस्त सचिव डॉ. अभिषेक देवीकर, श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदीचे मुख्य विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे उपस्थित होते.

उपराष्ट्रपती म्हणाले, उरुळी कांचन या गावात महात्मा गांधीजींनी मणिभाई देसाई, बाळकोबा भावे, श्रीमती गंगाबेन भाटे आणि इतर सहकाऱ्यांच्या मदतीने १९४६ या वर्षी या आश्रमाची स्थापना केली. ही संस्था आता जागतिक स्तरावर सन्मानित होणाऱ्या एका केंद्रात रूपांतरित झाली आहे. या आश्रमाद्वारे मानवतेसाठी दिल्या जाणाऱ्या महान सेवेमुळे आज हे छोटेसे गाव संपूर्ण जगात ओळखले जाते. 'निसर्गोपचार आश्रम' ही एक चळवळ आहे, एक तत्त्वज्ञान आहे आणि गांधीजींच्या कालातीत दृष्टिकोनातून प्रेरित झालेली एक जीवनपद्धती आहे. निसर्ग हाच सर्वश्रेष्ठ उपचारक आहे, असा गांधीजींचा दृढ विश्वास होता. नियमित शारीरिक व्यायाम, मानसिक शांतता आणि निसर्गाशी सुसंगत जीवनशैली स्वीकारण्याची प्रेरणा हा आश्रम आपल्याला देतो, असेही ते म्हणाले.

खरे आरोग्य हे गुंतागुंतीच्या वैद्यकीय उपचारांमध्ये नसून साधेपणा, शिस्त आणि निसर्गाशी सुसंवाद साधून जगण्यामध्ये सामावलेले असते अशी गांधीजींची शिकवण होती. त्यानुसार हा आश्रम निसर्गोपचार, योगसाधना तसेच प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेप्रती असलेल्या आपल्या दृढ कटिबद्धतेच्या माध्यमातून हजारो लोकांची सेवा करत आहे. आज संपूर्ण जग जीवनशैलीशी संबंधित आजारांचा सामना करत आहे. मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा आणि तणावाशी संबंधित विकार यांचे प्रमाण आज अत्यंत चिंताजनक वेगाने वाढत आहे. आजकाल प्रत्येकजण तणावाचा सामना करत मर्यादित गरजा आणि निसर्गाशी मेळ साधणाऱ्या जीवनशैलीद्वारे त्यावर मात करता येते, असे श्री. राधाकृष्णन म्हणाले.

आरोग्य म्हणजे केवळ रोगाचा अभाव नव्हे, याची हा आश्रम आपल्याला आठवण करून देतो. आरोग्य ही संपूर्ण शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक स्वास्थ्याची अवस्था होय. साधेपणा, कष्ट आणि प्रामाणिक मार्गाने आपण काम केले, तर आनंद आपोआपच आपल्या मनात प्रवेश करेल आणि आरोग्य चांगले राहील.

आज संपूर्ण जग, आरोग्य आणि स्वास्थ्यासह आधुनिक काळातील विविध आव्हानांवर उपाय शोधण्यासाठी आपल्याकडे आशेने पाहत आहे. जागतिक दृष्टिकोन आता बदलला आहे. केवळ पाश्चात्य वैद्यकशास्त्रच सर्वश्रेष्ठ मानले जात होते, तो काळ आता आपण मागे टाकला आहे. आपल्या पारंपरिक उपचारपद्धती आजारांच्या मुळावर उपचार करतात. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली, भारताने आपल्या पारंपारिक वैद्यकीय पद्धती, योग आणि तत्सम सर्वच क्षेत्रांचे पुनरुज्जीवन होत असून त्यांना जागतिक स्तरावरील मान्यता मिळत आहे. भारत आता 'जागतिक वेलनेस पर्यटनाचे' एक प्रमुख केंद्र म्हणून उदयास येत आहे. या आश्रमासह देशातील निसर्गोपचार केंद्रांमध्ये आजकाल मोठ्या संख्येने परदेशी पर्यटक उपचारांसाठी आवर्जून येत आहेत. आयुर्वेदिक उपचार, सिद्ध, युनानी उपचारपद्धतींना महत्व आले आहे. आज संपूर्ण जग 'योग दिन' साजरा करत आहे. आपण जेव्हा 'विकसित भारत' या संकल्पनेकडे पाहतो, तेंव्हा त्यासोबतच 'निरोगी भारत' असणेही आपल्यासाठी तितकेच आवश्यक ठरते. या प्रवासात आपल्या आश्रमासारख्या संस्थांची भूमिका अधिकच महत्त्वपूर्ण ठरते. निसर्गोपचार आश्रमाचे प्रयत्न आणि राज्य व केंद्र सरकारचे प्रयत्न यांच्या समन्वयातून होणारे कार्य हे हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने अत्यंत मोलाचे ठरेल, असे उपराष्ट्रपती म्हणाले.

जेव्हा व्यक्ती निरोगी असतात, तेव्हा कुटुंबे बळकट होतात आणि समाजाची भरभराट होते. तसेच राष्ट्राचा उत्कर्षही होतो. अशा वेळी, 'विकसित भारत २०२७' हे उद्दिष्ट त्याही आधी गाठणे शक्य होते. म्हणूनच, आपण सर्वांनी एकत्रितपणे काम केले पाहिजे. आपल्या सर्वांकडे संयम असणे आवश्यक आहे. आपण आपले मन नेहमीच एका 'प्रवाही' अवस्थेत ठेवले पाहिजे, जेणेकरून ते अधिकाधिक गोष्टी ग्रहण करू शकेल. 'निसर्गोपचार आश्रमा' ही संस्था पुढील पिढ्यांनाही असेच मार्गदर्शन, उपचार आणि प्रेरणा देत राहो, तसेच संपूर्ण मानवतेला संयमाचा धडा शिकवत राहील असा विश्वासही श्री. राधाकृष्णन यांनी व्यक्त केला.

डॉ. नारायण हेगडे यांचे 'आनंदाची रहस्ये' हे पुस्तक आनंदी जीवनाविषयी भाष्य करणारे आहे, असे त्यांनी सांगितले.

राज्यपाल श्री. वर्मा म्हणाले, महात्मा गांधी हे निसर्गोपचाराचे महान पुरस्कर्ते होते. स्वातंत्र्याच्या वर्षी ३३ कोटी लोकसंख्येवरून आपण १४० कोटी लोकसंख्या गाठली असून आयुर्मयादा दुप्पट झाली आहे. आपण अन्नाच्या बाबतीत स्वयंपूर्ण झालो आहे. मात्र, अन्नाची गुणवत्ता, विषयुक्त अन्नामुळे जीवनशैलीशी संबंधित आजारांसह अनेक आजारांचा प्रादुर्भाव वाढला आहे. निसर्गोपचार, आयुर्वेद, योगा, युनानी, आधुनिक उपचारपद्धतीं आपला समृद्ध वारसा आहे. निरोगी भारतासाठी निसर्गोपचार महत्वाचे आहेत. समग्र उपचार पद्धती आज महत्वाची असून निसर्ग हा आजारांवरील महान उपचारक आहे, असेही ते म्हणाले. या संदर्भातील महात्मा गांधी यांचे विचार आजही महत्वाचे आहेत असेही राज्यपाल म्हणाले.

निसर्गोपचार आश्रम गेली ८ दशके समाजाची सेवा करीत आहे. पर्यावरण प्रदूषण, व्यसनधीनता आणि अयोग्य आहारामुळे विविध आजार वाढत आहेत. अशा परिस्थितीत देशभरात निसर्गोपचाराचा प्रसार केल्यास रोजगार निर्मिती होण्यासोबत नागरिकांना निरोगी जीवनशैली स्वीकारण्यास प्रोत्साहित करता येईल. विकसित भारताचे स्वप्न निरोगी भारताच्या माध्यमातूनच पूर्ण होऊ शकेल. निसर्गोपचार आश्रमाने विद्यापीठांसोबत समन्वय साधून भारतीय पारंपरिक उपचार पद्धतीचा प्रसार करावा. त्याद्वारे अशा उपचारासाठी कुशल मनुष्यबळ प्राप्त होईल, असे श्री. वर्मा म्हणाले.

शेवटच्या माणसापर्यंत पोहोचणे हे मोठे आव्हान आहे. त्यासाठी हा आश्रम प्रयत्न करत आहे. आश्रमाला परत भेट द्यायला तसेच आश्रमाच्या आदिवासी भागात सुरू असलेल्या कार्यालाला भेट द्यायला आवडेल असेही राज्यपाल म्हणाले.

राज्यसभेचे उपसभापती हरिवंश नारायण सिंह म्हणाले, देशाला आत्मनिर्भर बनविण्यात स्वदेशी उपचारपद्धती महत्वाची आहे. त्यामुळे केंद्र सरकारने २०१४ नंतर केंद्र सरकारनेदेखील म.गांधीजींच्या या आश्रमासारख्या प्रयोगांचा विस्तार करण्याच्या कामाला वेग दिला आहे. केंद्राने आयुष मंत्रालयाची स्थापना केली असून प्रत्येक वर्षी मंत्रालयाची आर्थिक तरतूद ४ हजार ४०० कोटीहून अधिक आहे.

जगात रोगोपचार खर्चिक होत असतांना सेवाभाव ही या आश्रमाची विशेषतः आहे. इथली कार्यपद्धती लक्षात घेतल्यास त्यात महात्मा गांधीजींच्या विचारांचा सुगंध दरवळतो आहे असे म्हणता येईल. माती, पाणी, ऊन, हवा या माध्यमांतून या ठिकाणी उपचार होत आहेत. इथली शिस्त इतरांनाही मार्गदर्शक आहे. साधे जीवन, स्वयंशिस्त आणि निसर्गाचा सन्मान करीत गांधीजींना अभिप्रेत असलेली आनंदी जीवनशैली स्वीकारता येईल, असे त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, निसर्गोपचार आश्रम केवळ एक आरोग्य केंद्र नसून जीवन जगण्याचा महत्वपूर्ण मार्ग आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या प्रेरणेतून स्थापन झालेला हा आश्रम नैसर्गिक उपचारपद्धतीच्या माध्यमातून आरोग्य, स्वावलंबन आणि साधेपणाच्या जीवनाचा संदेश देतो. केवळ आजारांवरील उपचार नव्हे तर सुदृढ जीवनशैली आणि निसर्गासोबत संतुलन राखण्याची प्रेरणा देखील देत आहे. निसर्ग आणि महात्मा गांधी यांचे अतूट नाते होते. ग्रामीण भागाचा विकास हा त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू होता. भारताचा खरा आत्मा गावात वसतो, या विचारावर त्यांचा ठाम विश्वास होता. म्हणूनच त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात ग्रामीण उन्नती, स्वावलंबन आणि साधेपणाचा मार्ग स्वीकारला आणि समाजासमोर आदर्श निर्माण केला.

निसर्गाच्या सानिध्यात प्रत्येक आजार बरा करण्याची ताकद असते, हा गांधीजींचा संदेश आजही मार्गदर्शक आहे. या विचारांची प्रत्यक्ष अंमलबजावणी उरळी कांचन निसर्गोपचार आश्रम येथे पाहायला मिळते. गांधीजींचे हे विचार केवळ आरोग्यापुरते मर्यादित नाहीत, तर ते साधेपणा, स्वावलंबन आणि ग्रामीण विकासाचा व्यापक संदेश देणारे आहेत. 'खेड्याकडे चला' हा त्यांचा संदेश आजही तितकाच कालसुसंगत आहे, असेही त्या म्हणाल्या.

डॉ. हेगडे यांनी प्रास्ताविकात आश्रमाची माहिती दिली. ते म्हणाले, राष्ट्रपिता महात्मा गांधी हे याच दिवशी १९४६ येथे आले आणि सहकाऱ्यांच्या मदतीने निसर्गोपचार आश्रम स्थापन केला व स्थानिकांवर निसर्गोपचार केले. येथे आश्रमाचे तत्कालीन संस्थापकांनी आश्रमाच्या विस्तारासाठी प्रयत्न केले. तसेच येथील शेतकऱ्यांसाठी गाईंच्या वंशसुधारासाठी प्रयत्न केले.

यावेळी श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त डॉ. देखणे यांनीही मनोगत व्यक्त केले.

यावेळी डॉ. हेगडे लिखित 'आमच्या आनंदाचे रहस्य' अर्थात 'सिक्रेट्स ऑफ आवर हॅपीनेस' या पुस्तकाचेही यावेळी प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमाला आश्रमाचे विश्वस्त, वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, नागरिक उपस्थित होते.